**सुविचार** वाट पाहणाऱ्यांना तेवढेच मिळते, जेवढे प्रयत्न करणारे सोडून जातात. – डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम

# 'पुढारी'कार ग. गो. जाधव : कर्तृत्वाची गाथा

**'पुढारी'कार पद्मश्री स्व. डॉ. ग. गो. जाधव यांचा आज तिसावा स्मृतिदिन. वारकरी पंथांमध्ये ज्या अविचल निष्ठेने आणि अपार श्रद्धेने तुकारामांचा निर्वाण दिन साजरा केला जातो त्याच भावनेने 'पुढारी'कारांच्या स्मृती जागवत आजचा जागर जागविला जातो. ध्रुवासारखे अढळ स्थान त्यांनी स्वकर्तृत्वाने निर्माण केले. न्यायाधीश जसा निःपक्षपाती असायला हवा त्याचप्रमाणे पत्रकार निर्भय आणि बाणेदार असायला हवा हे त्यांनी आपल्या उदाहरणाने सर्वांना दाखवून दिले.**



प्रा. भैरव कुंभार

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने 'पुढारी'कार ग. गो. जाधव स्मृतिव्याख्यानमालेने आजचा स्मृतिदिन साजरा केला जात आहे. चाकोरीबद्ध शिक्षणाच्या पलीकडे जाऊन, शिक्षण समाजाच्या सर्व थरांपर्यंत, त्यातही सामान्यातला सामान्य शेतकरी-कष्टकऱ्याच्या वाड्या-वस्त्यांवरील झोपडीपर्यंत, ज्ञानामृत पोहोचवून 'शहाणे करून सोडावे सकळ जन' याप्रमाणे शिवाजी विद्यापीठाने काही अभिनव उपक्रम राबविले आहेत. त्यापैकी आजची व्याख्यानमाला हा एक नजरेत भरणारा उपक्रम आहे. एका अर्थी शासनाने शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून, आयुष्यभर लोकशिक्षण करणाऱ्या 'पुढारी'कार ग. गो. जाधव यांच्या रूपाने एका लोकविद्यापीठाच्या कुलपतींचा शासकीय विद्यापीठाच्या कुलगुरूंनी केलेला यथोचित गौरव आहे. तेवढाच तो उचितही आहे. कारण शिवाजी विद्यापीठाच्या स्थापने आधीपासून 'पुढारी'कारांचे नाते शिवाजी विद्यापीठाशी जोडलेले आहे. ग. गो. जाधव यांनी १९३३ साली आपल्या 'सेवक' साप्ताहिकाच्या पहिल्याच अंकामध्ये आपले गुरू भास्करराव जाधव यांच्या लेखासोबत इतिहासाचे गाढे अभ्यासक, राजाराम महाविद्यालयाचे तत्कालीन प्राचार्य डॉ. बाळकृष्ण यांचा कोल्हापूरला शिवाजी विद्यापीठ स्थापन व्हावे, असे लिखित स्वरूपात जाहीरपणे मागणी करणारा लेख प्रसिद्ध केला होता. हा इथला इतिहास आहे.

### शिवाजी विद्यापीठ स्थापनेत 'पुढारी'चे मोलाचे योगदान

छत्रपती राजाराम महाराजांचे, शिवाजी विद्यापीठ स्थापनेचे स्वप्न साकार व्हावे यासाठी जी मोजकी मंडळी कार्यरत होती, त्यामध्ये ग. गो. जाधव यांचे कार्य मोलाचे होते. १९३३ पासून शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेपर्यंत सुमारे २९ वर्षे त्याचा सातत्याने पाठपुरावा करण्याचे काम ग. गो. जाधव आणि 'पुढारी'ने केले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या उभारणीमध्येही 'पुढारी'ने आपली जबाबदारी कटाक्षाने पूर्ण केली आहे. 'पुढारी'चे विद्यमान संपादक पद्मश्री डॉ. प्रतापसिंह जाधव यांचेही योगदान महत्त्वाचे ठरले आहे. फेब्रुवारी १९८६ मध्ये 'पुढारी'कार ग. गो. जाधव यांना डी. लिट. ही सन्माननीय पदवी प्रदान करून शिवाजी विद्यापीठाने त्यांचा गौरव केला. शिवाजी विद्यापीठ आणि 'पुढारी' व 'पुढारी'कार यांचे ऋणानुबंध हे असे कायम जिव्हाळ्याचे आणि सौहार्दाचे राहिले आहेत.

समाजाच्या सर्व थरांतील आणि परिवारातील जनता स्मृतिदिनात भाग घेत असते. 'पुढारी'ची मुळे जनमानसात, नसानसात किती खोलवर रूजली आहेत, याचेच दर्शन यातून घडते. 'पुढारी' हे कुंडीतील रोप नाही, कोणत्या तरी वृक्षावरचे छाट कलम नाही. तो स्वयंभू वृक्षराज आहे, सर्वांना सामावून घेणारा. या व्याख्यानमालेत गुणवत्ता आणि दर्जा यामध्ये कोणतीच तडजोड केलेली नाही. प्रबोधनातून समाज परिवर्तन हे 'पुढारी'चे ब्रीद इथे सातत्याने जपले जाते.

### महापुरुषांचा सहवास

'पुढारी'कार ग. गो. जाधव यांनी आपले संपूर्ण आयुष्य पुढारीसमीप वेचले. एकदा आपल्या आवडीचे क्षेत्र निश्चित झाल्यानंतर त्यामध्ये स्वतःला सर्वस्वानिशी झोकून देऊन, वाहून घेऊन कार्यरत राहणे हा 'पुढारी'कारांचा स्वभाव होता. समाज ही त्यांची पाठशाळा बनली ती कायमचीच. ना. भास्करराव जाधव, दिनकरराव जवळकर यांच्यासारखे समर्थ गुरू, प्रबोधनकार ठाकरे, मामा वरेरकर, पु. रा. लेले यांचा निकटचा सहवास व प्रेम म. गांधी यांचे संस्कार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा निकट सहवास आणि महात्मा फुलेंचे पुरोगामी विचार अशा मेळाव्यामध्ये मुंबईसारख्या महानगरीमध्ये त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण झाली. कामगार चळवळी, स्वातंत्र्याची चळवळ अशा चळवळीतून विचाराची दिशा स्पष्ट होत गेली. 'कैवारी', साप्ताहिक 'तेज' यातून वृत्तपत्रसृष्टीत पदार्पण झाले. 'मायेचे वळसे' या लेखाने लेखणी हातात रूळली. या माध्यमातून 'पुढारी'कार नावाचा एक महामानव आकाराला आला. पत्रकारिता त्यांच्या हाडी-मासी इतकी भिनली की, त्यातून ते कधी बाहेर पडलेच नाहीत. किंबहुना वृत्तपत्रसृष्टीत ते इतके रमले आणि रूळले की तोच त्यांचा जीवनधर्म बनला. सर्वस्व पणाला लावून, येणाऱ्या प्रत्येक संकटावर जिद्दीने मात करत, अडचणींचे डोंगर पार करत ग. गो. यशाच्या शिखरावर केव्हाच विराजमान झाले. ध्रुवासारखे अढळ स्थान त्यांनी स्वकर्तृत्वाने निर्माण केले. न्यायाधीश जसा विस्तृत आणि निःपक्षपाती असायला हवा त्याचप्रमाणे पत्रकार निर्भय आणि बाणेदार असायला हवा, हे त्यांनी आपल्या उदाहरणाने सर्वांना दाखवून दिले.

### 'पुढारी' जनतेच्या गळ्यातला ताईत

ग.गों.नी आपला पत्रकारितेचा श्रीगणेशा मुंबईसारख्या महानगरात गिरविला तरी ते तेथे फारसे रमले नाहीत. विशिष्ट परिस्थितीमध्ये त्यांनी कुठेही मुक्काम न ठोकता सरळ कोल्हापूर गाठले. जन्मभूमी हीच कर्मभूमी म्हणून स्वीकारली. सुरुवातीला 'सेवक' नंतर साप्ताहिक 'पुढारी' आणि शेवटी 'दै. पुढारी' अशी वळणे घेत ते या व्यवसायात कायमचे स्थिरावले. स्वतःच्या हिमतीवर जमिनीवर घट्ट पाय रोवून ताठ मानेने उभे राहिले. बघता बघता 'पुढारी' जनतेच्या गळ्यातला ताईत बनला. 'पुढारी' वाचल्याशिवाय कोल्हापूरकरांची पहाट सुनी सुनी झाली. 'काय म्हणतो पुढारी!' असे प्रश्न अडाणी जाणतेसुद्धा विचारू लागले आणि 'पुढारी' म्हणजे वृत्तपत्र आणि वृत्तपत्र म्हणजे पुढारी असे समीकरण तयार झाले. 'पुढारी'ने लोकांना वाचायला शिकविले. वाचणाऱ्यांना लिहिते केले. 'शहाणे करून सोडावे सकळ जन' हा मंत्र जे जे आपल्याशी ठावे ते ते इतरांना मुक्तहस्ते उधळत राहिले.

'पुढारी'कारांनी स्वातंत्र्यपूर्वकाळ पाहिला. स्वातंत्र्याची पहाट अनुभवली, स्वातंत्र्योत्तर काळाशी समरस झाले. यामुळेच हे करीत असतानाच ग. गो.नी आपले एकुलते एक चिरंजीव प्रतापसिंह ऊर्फ बाळासाहेब यांना खुबीने पत्रकारितेत उतरविले. यशाची गुरूकिल्ली त्यांच्या स्वाधीन केली. 'पुढारी'कारांच्या दुसऱ्या पिढीने म्हणता म्हणता झेप घेतली आणि 'बापसे बेटा सवाई' या उक्तीप्रमाणे पत्रकारिता आणि कायदा यांचा मेळ घालीत या क्षेत्रामध्ये यशाची उत्तुंग गुढी उभी केली. प्रादेशिकतेच्या सीमा पार करून राष्ट्रीय पायरीवर 'पुढारी' जाऊन पोहचला. दोन-अडीच हजार प्रतींवरून १० लाख प्रती निघू लागल्या. अवघा देश कवेत घेऊन इंटरनेटच्या माध्यमातून आज 'पुढारी' जगभर पोहचला आहे हे सारे कर्तृत्व विद्यमान संपादक पद्मश्री डॉ. प्रतापसिंह जाधव यांचे.

### मराठी माणसाला अभिमान

लेखणी ही ढालीसारखी वापरता येते आणि तलवारीसारखीही वापरता येते. प्रसंग कसा आहे, कोणावर आहे आणि लेखणी ज्याच्या हातात आहे त्या मनगटात किती ताकद आहे यावर सारे अवलंबून असते. 'पुढारी'कारांच्या तीनही पिढ्या यामध्ये वाकबगार आहेत. डॉ. योगेश प्रतापसिंह जाधव तथा दादा यांनी यापुढेही एक पाऊल टाकून आपल्या कल्पकतेची आणि कर्तृत्वाची चुणूक दाखविली आहे. टोमॅटो एफ.एम.च्या रूपाने वाचनीयतेकडून श्रवणीयतेकडे ते जनतेला घेऊनच चालले आहेत. कुणाही मराठी माणसाला अभिमान वाटावा, अशीच ही वाटचाल आहे.उद्योग सारेच करतात, व्यवसायही करतात. पण -

**'वेचुनिया धन सक्षम व्यवहारे।**
**उदास विचारे वेचतही।**

या तुकारामांच्या वचनाचा अंगीकार करणारे फारच विरळ असतात. 'पुढारी'कारांच्या तिन्ही पिढ्या अशा विरळ आहेत. जेव्हा जेव्हा काही अरिष्टे निर्माण झाली, समाजावर, जनतेवर संकटे आली त्यावेळी 'पुढारी' सर्वांआधी पुढे सरसावला. मग तो महापूर असो, अतिवृष्टी असो, भूकंप असो वा परचक्र असो, सियाचीन येथे भारताच्या अतिउंच ठिकाणी 'पुढारी'कारांच्या पुढाकाराने भारतीय सैनिकांसाठी उभे राहिलेले सुसज्ज हॉस्पिटल असो. आपण समाजाचे काही देणे लागतो. ते आपण दिलेच पाहिजे.

या भावनेतून 'पुढारी'कारांची वाटचाल नेहमीच चालत राहिली आहे. संत ज्ञानेश्वरांच्या शब्दांत सांगायचे तर, मेघमालेतून अमृताच्या धारा वर्षत राहाव्यात, तसा हा सारा मामला आहे. 'पुढारी'कार पद्मश्री कै. डॉ. ग. गो.जाधव तथा आबाजींच्या स्मृतीस विनम्र अभिवादन!

(संग्रहित लेख)

20 MAY 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## 'पुढारी'कार कै. डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेत

# एअर मार्शल भोसले यांचे आज व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

दैनिक 'पुढारी'चे संस्थापक संपादक पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव यांच्या ३० व्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या वतीने 'पुढारी'कार पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेअंतर्गत शनिवारी (दि. २०) निवृत्त एअर मार्शल, केंद्रीय लोकसेवा आयोगाचे सदस्य अजित भोसले यांचे व्याख्यान होणार आहे. 'सैन्यदलांची सुसज्जता आणि संरक्षण उत्पादनातील संधी' या विषयावर भोसले विचार मांडणार आहेत. शाहू स्मारक भवन येथे सायंकाळी पाच वाजता हे व्याख्यान होणार आहे. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असतील.

'पुढारी'कार डॉ. ग. गो. जाधव यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या वतीने व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते. दरवर्षी २० मे रोजी होणाऱ्या या व्याख्यानमालेत विविध क्षेत्रांतील नामवंत, तज्ज्ञ, अभ्यासक, विचारवंतांनी विविध विषयांवर विचार मांडले आहेत. तत्कालीन केंद्रीय माहिती व तंत्रज्ञानमंत्री दिवंगत प्रमोद महाजन, तत्कालीन नियोजन आयोगाचे माजी सदस्य डॉ. भालचंद्र मुणगेकर, संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे, भारतीय सैन्यदलाच्या नॉर्दर्न कमांडचे तत्कालीन चीफ लेफ्टनंट जनरल के. टी. पारनाईक, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, राज्याच्या कारागृह विभागाच्या तत्कालीन महानिरीक्षक मीरा बोरवणकर, ज्येष्ठ पत्रकार अरुण शौरी, कुमार केतकर, अरुण साधू, अरविंद गोखले, साहित्यिक डॉ. य. दि. फडके, माधव गडकरी, द. मा. मिरासदार, विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. अरुण निगवेकर, लेफ्टनंट जनरल अर्जुन रे, निवृत्त मेजर जनरल शशिकांत पित्रे, तत्कालीन नियोजन आयोगाचे माजी सदस्य, पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू खा. डॉ. नरेंद्र जाधव आदींनी या व्याख्यानमालेत विचार मांडले आहेत.



शनिवार, दि. २० रोजी निवृत्त एअर मार्शल, केंद्रीय लोकसेवा आयोगाचे सदस्य अजित भोसले 'सैन्यदलांची सुसज्जता आणि संरक्षण उत्पादनातील संधी' या विषयावर पुष्प गुंफणार आहेत. अजित भोसले हे मूळचे बस्तवडे (ता. कागल, जि. कोल्हापूर) येथील रहिवाशी आहेत. त्यांचे वडील दिवंगत शंकरराव भाऊसाहेब भोसले-पाटील हे शेतकी खात्यात उच्च अधिकारी होते. तसेच त्यांच्या आई आशादेवी शंकरराव भोसले या शिवाजी कॉलेज बार्शी येथे प्राध्यापिका होत्या. कोल्हापुरातले सुप्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ डॉ. राजाराम विष्णू भोसले हे त्यांचे काका आहेत.

अजित भोसले यांना अलौकिक देशसेवेसाठी विशिष्ट सेवा पदक (२००५) व अतिविशिष्ट सेवा पदकांनी (२०१०) सन्मानित केले आहे. भारतीय हवाई दलात ते सर्वोत्तम व्यावसायिक श्रेणीत आहेत. हवाई दलाच्या सामरिक विभागात परीक्षक व निरीक्षक म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. ते पुण्यातल्या नॅशनल डिफेन्स ॲकॅडमीचे सहसंचालक व मुख्य प्रशिक्षक होते. त्यांनी संरक्षण मंत्रालयात काम केले आहे. एअर मार्शल अजित भोसले यांनी 'एनडीए'मध्ये विविध अभ्यासक्रम सुरू केले आहेत. त्यांनी राष्ट्रीय स्तरावर भारतीय राष्ट्रीय संरक्षण विद्यापीठ व राष्ट्रीय युद्ध स्मारक प्रकल्प राबविले आहेत. त्यांनी भारतीय उच्चस्तरीय रक्षा शिष्टमंडळांचे इंग्लंड, श्रीलंका आणि दक्षिण आफ्रिका या देशांमध्ये नेतृत्वही केले आहे.

### कोल्हापुरातील उद्योजकांना सुवर्णसंधी

'सैन्यदलांची सुसज्जता आणि संरक्षण उत्पादनातील संधी' या विषयावर भोसले विवेचन करणार आहेत. कोल्हापुरातील उद्योजकांसाठी हे व्याख्यान म्हणजे मोठी पर्वणी ठरणार आहे. औद्योगिक क्षेत्रात कोल्हापूरचे मोठे नाव आहे. संरक्षण दलातील विविध उत्पादन निर्मितीशी कोल्हापूरचा संबंध आहे. भोसले यांचा संरक्षण क्षेत्रातील कामाचा मोठा अनुभव आहे. ते कोल्हापूरचे असल्याने कोल्हापूरच्या गुणवत्तेबाबत त्यांना माहिती आहे. या सर्व पार्श्वभूमीवर या व्याख्यानाच्या निमित्ताने उद्योजकांना संरक्षण क्षेत्रातील उत्पादनाची आवश्यकता आणि निर्मिती याबाबत नवे दालनच खुले होणार आहे. हे व्याख्यान उद्योजकांसाठी सुवर्णसंधी ठरणार आहे.

### कार्यक्रम वेळेवर सुरू होणार

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने सुरू असलेल्या या व्याख्यानमालेत आजवर अनेक मान्यवरांनी आपले विचार मांडले. विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ, अभ्यासक असे व्याख्याते लाभत असलेली ही व्याख्यानमाला वेळेवर सुरू होते. शनिवार, दि. २० रोजीही व्याख्यान सायंकाळी पाच वाजता वेळेवर सुरू होणार आहे. यामुळे नागरिकांनी कार्यक्रमापूर्वी १५ मिनिटे आधी शाहू स्मारक भवन येथे उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

20 MAY 2017
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



समाजसंवाद

# घामाच्या अलंकारानं दिलं जगण्याचं बळ

। डॉ. एस. एन. पठाण

कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठात १९७० साली एम.एस्सीला असताना 'कमवा आणि शिका' योजनेंतर्गत काम करून मी शिक्षण घेतलं. ते माझ्या आयुष्यातील मंतरलेले दिवस होते. त्या वेळी आम्ही सर्व विद्यार्थी खूप अभ्यास करीत होतो. त्याचबरोबर खूप कष्टही करत होतो; पण त्या कामाचा कधी आम्हाला शीण वाटला नाही. वसतिगृहात सकाळी बरोबर ७ वाजता घंटा व्हायची. वसतिगृहातील एम.ए. व एम.एस्सी.चे आम्ही सर्व विद्यार्थी खाकी हाफ पँट, खाकी हाफ शर्ट आणि हातामध्ये खुरपं घेऊन एका मिनिटात वसतिगृहाच्या पोर्चमध्ये जमा होत असू.

त्यानंतर आम्ही विद्यापीठाच्या शेतावर कामाला निघत असू. 'कमवा आणि शिका' योजनेचे विद्यार्थी शिस्तबद्ध आहेत. ते शिस्तीनं काम करतात, अशी प्रेरणा विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या भाषणातून आम्हाला सतत मिळत होती. म्हणूनच आम्ही विद्यार्थी एका रांगेत शेतावर कामाला जात असू. गप्पा मारत, कुणाच्या खांद्यावर हात ठेवून, हसत-खिदळत जाणं आम्हाला माहीत नव्हतं. त्या वेळचे आमचे पर्यवेक्षक पोतदार शिस्तीचे कठोरपणे पालन करीत.

पोतदार आमच्याकडून तीन तास प्रत्यक्ष काम करून घेत. काम करताना पावसाळ्याच्या दिवसांत फारच मजा यायची. आम्ही जेव्हा सकाळच्या वेळी विद्यापीठाच्या त्या परिसरातील भाताच्या शेतात काम करायला जायचो, तेव्हा कधी कधी वरून रिमझिम पाऊस पडत असायचा. त्या काळात कोल्हापूरला खूप पाऊस पडायचा. शेतं पाण्यानं भरलेली असायची. भाताचं हिरवंगार पीक शेतामध्ये उभं आहे. पाणी झुळझुळ वाहतंय. अशा वेळी आम्ही भाताच्या शेतामध्ये चिखल कोळपणी करत असू. चिखल कोळपणं म्हणजे एका विद्यार्थ्यानं कोळप्याचं जू चक्क खांद्यावर किंवा काखेत घेऊन बैलासारखं पुढं ओढायचं आणि एका विद्यार्थ्यानं मागाहून त्या कोळप्याचं रुमणं हातात धरायचं. शेतीचा फार अनुभव नसल्यामुळं मला कोळप्याच्या मागं राहून रुमणं धरणं फारसं जमायचं नाही. कधी कधी ते कोळपं जरासं इकडं तिकडं झालं, तर गवताऐवजी भातच निघायचा. त्यामुळं माझी ड्युटी लागत असे ती कोळप्याचं जू काखेत घालून कोळपं पुढं ओढण्यासाठी. जवळजवळ गुडघाभर पाय चिखलात जातील इतका चिखल त्या शेतात असायचा; परंतु कोळपं पुढं ओढावच लागायचं. कारण, मागून जो विद्यार्थी कोळप्याचं रुमणं धरून असायचा, तो सतत ओरडत असायचा, 'लवकर चल, लवकर चल!'

मग पाय चिखलातून काढला आणि पुढं टाकला, की कधी कधी बांधावरचा बाभळीचा काटा पायात टचकन टोचला जायचा आणि रक्ताची धार लागायची.



भरभरून रक्त यायचं; पण तिथं कसलं औषधपाणी? हातानंच काटा उपटायचा. चिखलानं रक्त दाबायचं आणि पुन्हा पुढं पाय टाकायचा. अशा पद्धतीने ही चिखल कोळपणी चालायची.

काटा रुतला म्हणून जर कोळपणं थांबलं, तर बाजूच्याचं कोळपं आमच्या पुढं जायचं. पुढं जाता जाता तो विद्यार्थी कॉमेंट करायचा, 'लेका, मेसमध्ये चपात्या खायला सर्वांत पुढं असता आणि आता कोळपं मागं का?' हे सहज विनोदानं बोललेलं त्याचं बोलणं मला मात्र टोचून जायचं आणि मग काटा रुतलेला असतानासुद्धा पाय पुढं टाकण्याशिवाय पर्याय नसायचा. ही चिखल कोळपणी चालू असताना दोन-अडीच तास केव्हा निघून जायचे, हे आम्हाला कळायचं देखील नाही. आम्ही कोळपं ओढण्यामध्ये किंवा धरण्यात ॲक्टिव्ह होतो. पुढंसुद्धा आम्ही आमच्या क्षेत्रात सतत ॲक्टिव्ह राहिलो, हे विशेष! आम्ही सर्व विद्यार्थी कामावरून परत आलो की, वसतिगृहाच्या बाहेरच उघड्यावर आंघोळ करायचो. त्याचं कारण असं की, आमचे पाय हे त्या शेतातील चिखलानं इतके भरलेले असायचे की, जर आम्ही बाथरूममध्ये जाऊन आंघोळ केली, तर त्या चिखलानं सांडपाण्याचे पाईप चोक व्हायचे. आमच्या वसतिगृहाची इमारत ही दोन मजली होती. त्यावर पाण्याची टाकी होती. त्यामुळं मुलांनी एक शक्कल काढली होती. त्या पाण्याच्या टाकीतून एक पाईप सरळ स्लॅबवरून खाली सोडला होता. तो पाईप आम्ही सुरू करायचो. मग जसा एखादा धबधबा वरून पडावा, तसं पाणी पडत असे आणि प्रत्येक जण दोन-दोन, तीन-तीन मिनिटं त्या धबधब्याखाली थंड पाण्यात उभा राहत असे. अशा रीतीनं ३ ते ५ मिनिटांमध्ये आमची आंघोळ व्हायची. मेसमध्ये जेवण झालं की, नंतर विद्यापीठाच्या प्रगत प्रयोगशाळेत विविध प्रयोग करण्यात आम्ही रमून जात असू.

एकदा आमच्या 'कमवा आणि शिका योजने'स राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी यांनी भेट दिली. आम्ही विद्यार्थ्यांनी त्यांना प्रात्यक्षिक दाखविलं. आम्ही विद्यार्थी काय काम करतो, त्यामुळं आमच्यामध्ये कसा आत्मविश्वास निर्माण होतो, तसेच आम्ही दुसऱ्यांवर अवलंबून न राहता स्वतःचं शिक्षण स्वतःचं कसं करतो, हे मी तीन-चार मिनिटांत त्यांना इंग्रजीमध्ये कथन केलं. राष्ट्रपतींनी माझ्या बोलण्याचं कौतुक केलं. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी टाळ्या वाजवल्या होत्या. हा प्रसंग मी आयुष्यात कधीही विसरणार नाही.

आजही शिवाजी विद्यापीठात जाण्याची संधी मिळाली की, मी डॉ. आप्पासाहेब पवार वसतिगृहावर जाऊन येतो. क्षणभर जुन्या आठवणींत मी रमून जातो. आज दुर्दैवानं कमी शिक्षण फी असणाऱ्या सामान्य दर्जाच्या सरकारी शिक्षण संस्था व अत्यंत महागडी फी असणाऱ्या उच्च दर्जाच्या खासगी शिक्षण संस्था अशा दोन प्रकारच्या शिक्षण संस्था समाजात निर्माण झाल्या आहेत. त्यांच्या माध्यमातून समाजामध्ये गरीब आणि श्रीमंतांतील दरी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. सामान्य पालकांचा प्रश्नच येत नाही; परंतु मध्यमवर्गीयांनी जरी आपल्या मुलांना उच्च दर्जाच्या खासगी शिक्षणसंस्थांत शिकवायचं ठरवलं, तर त्यांना आयुष्यभर केवळ मुलांच्या शिक्षणासाठीच खपावं लागेल. सध्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या फी वर जोरदार चर्चा सुरू आहे; परंतु त्यातून फार काही निष्पन्न होईल, असं मला वाटत नाही.

अशा वेळी विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षणासाठी पालकांवर अवलंबून न राहता 'कमवा आणि शिका' 'अशा योजनेच्या माध्यमातून आपलं शिक्षण पूर्ण केलं, तर कमीत कमी समाज तरी दुभंगला जाणार नाही; परंतु त्यासाठी अशी योजना प्रत्येक महाविद्यालयात व विद्यापीठात सुरू व्हावयास हवी. युवा शक्तीचा उपयोग 'कमवा आणि शिका' योजनेच्या माध्यमातून समाज उभारणीसाठी आणि राष्ट्र निर्माणासाठी करायला हवा. विद्यार्थ्यांद्वारे विविध सामाजिक प्रकल्प राबवायला हवेत. घाम हाच खरा युवकांचा अलंकार ठरावयास हवा. परदेशांत आजदेखील अनेक विद्यार्थी काम करूनच शिकतात; परंतु यासाठी सरकारनं 'विद्यार्थी रोजगार हमी योजना' सुरू करावयास हवी.

आयुष्यामध्ये मलादेखील अनेक अडचणी आल्या; परंतु केवळ 'कमवा आणि शिका' योजनेने दिलेल्या आत्मविश्वासामुळं आणि बळामुळं मी डगमगलो नाही. अवघड वाटेवर 'कमवा आणि शिका' योजनेनं दिलेल्या बळामुळंच तर मी जीवनात भक्कमपणे उभा राहू शकलो हे निश्चित. एक मात्र खरं! आज ५० वर्षांनंतर जेव्हा मी मागं वळून पाहतो, तेव्हा प्रतिकुल परिस्थतीतून काम करून आम्ही शिक्षण घेतलं याचा आम्हाला अभिमान वाटतो.

**(लेखक नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे माजी कुलगुरू व आळंदी येथील विश्वशांती केंद्राचे सल्लागार आहेत.)**

**संपर्क : ९८२२३६२६०३**